**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, MAR–APR, 2018, VOL- 5/44*

# म.कर्वे यांचे स्री शिक्षणविषयक विचार

**सौ.सुचिता राजू पवार & अनुराधा सहस्त्रबुद्धे, Ph. D.**

***टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी,पुणे,37***

*(Email - suchitarpawar@gmail.com)*
*(Email - Anuradha1054@gmail.com)*

**Abstract**

***स्वामी विवेकानंद म्हणतात ; उत्तम चारित्र्य म्हणजे शिक्षण; तर म. गांधीजी म्हणतात;स्वावलंबन हेच खरे शिक्षण. भारतात शैक्षणिक क्षेत्रात मोलाची भर घालणाऱ्या अनेक विद्वानांनी शिक्षणाचा अर्थ अतिशय उत्तमरीत्या सामाजापर्यंत पोहचवलेला आहे.कविवर्य रवींद्रनाथ टागोर सांगतात ; शिक्षण म्हणजे आत्माविष्कार.शिक्षण हेच मानवाच्या प्रगतीचे मुलभूत साधन होय.शिक्षणाशिवाय कोणतीही प्रगती अशक्य आहे. राजा राममोहन राय, पं.ईश्वरचंद्र विद्यासागर, विरेशलींगम पंतलू, पं. रमाबाई, म. फुले, म. गांधी,राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. विठ्ठल रामजी शिंदे, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, अशा अनेक विभूतींनी आपले आयुष्य शिक्षण व शिक्षणाचा प्रसार यासाठी खर्ची घातले. त्यापैकी एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणजे म. धोंडो केशव कर्वे होय. त्यांच्या आत्मचरित्रात ते लिहितात ; " स्री शिक्षणाच्या कार्याची लांबी , रुंदी, खोली, वाढविण्याच्या महत्कार्यासाठी मी आपले जीवित अर्पण करीन अशी मनाची तयारी असली पाहिजे." या वाक्यातुनच त्यांची स्री शिक्षणाविषयीची तळमळ दिसून येते. म. कर्वे यांनीही आपले १०५ वर्षांचे दीर्घायुष्य केवळ स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात घालवले . विधवा शिक्षण,प्रौढ शिक्षण, स्त्री शिक्षण ,इंग्रजी शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण, ग्रामीण भागातील शिक्षण , महिलांसाठी उच्च शिक्षण,संसारोपयोगी शिक्षण, समाजशिक्षण, कृतियुक्त शिक्षण, ललितकला शिक्षण, अशा शिक्षणाच्या अनेक अंगांचा म. कर्वे यांनी सखोल विचार करून शिक्षणाचे व शिक्षण प्रसाराचे कार्य केले. त्यांच्या प्रत्येक कृतीमागे विशिष्ठ विचार होता. त्याचाच हा उहापोह.***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

* **विषय विश्लेषण** :

**म.कर्वे हे मुळात हाडाचे शिक्षक होते. त्यांनी सुरवातीस शिकवण्या घेवून आपले शिक्षण पूर्ण केले. वाचनाची आवड आणि गणित विषयाचा व्यासंग ,जिद्द, चिकाटी ही त्यांची गुणवैशिष्ट्ये. अठराव्या शतकात मुलींना शिक्षणाचा अधिकार नव्हता तेव्हा ते स्री शिक्षणासाठी आग्रही होते. एवढचनव्हे तर त्यांनी विधवाशिक्षणाच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली.विधवांच्या पुनर्विवाहाच्या प्रश्नाशी झगडत राहून जितक्या विधवांना कष्टमय स्थितीतून बाहेर काढता येणे शक्य आहे, त्यापेक्षा शिक्षणाचा प्रश्न हाती घेतला तर कितीतरी पट अधिक विधवांना कष्टमय स्थितीतून वर काढता येईल हा त्यामागे त्यांचा विचार होता.४ मार्च १९०७ रोजी पुण्यात त्यांनी मुलींसाठी शाळा सुरु केली. त्यावेळी ६ मार्च १९०७ च्या दैनिक ज्ञानप्रकाशात त्यांनी शाळा काढण्यामागील पुढील हेतू स्पष्ट केले** :

**१) अनेक पालकांच्या मनात असूनही त्यांच्या मुलींना शाळेचा फायदा मिळू शकत नाही ही अडचण दूर व्हावी.**

**२) स्रियांना गृहिणीपदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडून समाजविषयक कर्त्याव्यांविषयी ओळख व्हावी.**

**३) सुशिक्षित स्रियां तयार करण्याचा प्रयत्न करणे.**

**४) स्री शिक्षणासाठी नवीन अभ्यासक्रम ठरविणे.**

**५) विद्यार्थिनीची राहण्याची, विध्याभासाची सोय करणे.**

**६) विशेषतः मध्यम व गरीब स्थितीतील लोकांना विद्यालयाचा उपयोग व्हावा.**

**७) उदार हिंदू धर्माचे शिक्षण मिळावे याकडे लक्ष देणे.**

**म. कर्वे यांनी शिक्षण क्षेत्रात विशेषतः स्री शिक्षणासाठी महत्वपूर्ण कार्य केले. १९०८ साली केसरी या अंकात त्यांनी एका लेखात आपले स्री शिक्षणासबंधी पुढील विचार मांडले.**

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

- **स्री शिक्षणासाठी सरकारकडून जास्त प्रयत्न झाले पाहिजेत.परंतु अनेक गोष्टीमुळे तिकडे दुर्लक्ष होऊ शकते म्हणून लोकांनी मुलींच्या शाळा काढून त्या सरकारच्या स्वाधीन केल्या पाहिजेत.**
- **वृत्तपत्रांनी स्री शिक्षणासंबंधी लोकमत तयार करण्याचे काम हाती घेतले पाहिजे.**
- **वेळप्रसंगी मुलांच्या शाळेतही मुलीना पाठवून शिक्षण दिल्यास स्री शिक्षणात प्रगती होईल.**
- **मिशनरी लोकांनी धर्मप्रसाराच्या हेतूने का होईना स्री शिक्षणास मदत केली आहेच परंतु त्याच बरोबरीने आपणही शाळा उभारायला हव्यात आणि त्याचा जास्तीत जास्त लाभ घ्यायला हवा.**
- **धनिक व सामान्य लोकवर्गणीतून स्वार्थत्यागी पुरुषांनी खाजगी शाळा चालवाव्यात.**
- **स्री शिक्षणाच्या कार्याची तळमळ असणार्यांनी स्री शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य, पवित्र देशकार्य-धर्मकार्य म्हणून केले पाहिजे.**
- **स्री शिक्षणाच्या कार्याची लांबी, रुंदी, व खोली वाढवण्याच्या महत्कार्यासाठी मी आपले जीवन अर्पण करीन आणि पडतील ते कष्ट सोशीन अशी मनाची तयारी असली पाहिजे.**
- **स्रीयांच्या शिक्षणासाठी निरपेक्ष वृत्तीने कार्य करणाऱ्या स्रियांचे संघ तयार झाले पाहिजेत तरच शिक्षणाचा प्रश्न सुटण्याची आशा आहे. ( कर्वे – पटवर्धन १९५८, पान नं. १५९ -१६२ )**
- **चांगले विचार फार काळ टिकत नाहीत, तेव्हा ते ती तीव्र असताना माणसाने चांगले कार्य उरकून घ्यावे. असे त्यांचे मत होते. म्हणूनच त्यांच्या मनात शिक्षणाविषयी जे-जे विचार आले ते-ते त्यांनी प्रत्यक्षात आणले.**

**आपण स्थापन केलेली शाळा ही उत्कृष्ट शाळा व्हावी म्हणून त्यांनी अनेक प्रयत्न केले. स्रियांसाठी वेगळ्या ऐछिक अभ्यासक्रमाची सोय केली, गणित व इतिहास –भूगोल ऐवजी पाकशास्त्र, शरीरशास्त्र, बालसंगोपनशास्त्र, गृहशास्त्र,आरोग्यशास्त्र,**

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

प्रसूतिशास्त्र ई. स्रियांना त्यांच्या पुढील जीवनात उपयोगी पडतील अशा विषयांचा समावेश केला . मराठी शाळांसाठी शिक्षिका तयार व्हाव्यात म्हणून स्रियांचे ट्रेनिग कोलेज ( अध्यापिका विद्यालय ) स्थापन केले.

शिक्षण व्यवस्थेतील सध्याचा ज्वलंत प्रश्न म्हणजे शिक्षणाचे माध्यम कोणते असावे? मराठीचे महत्त्व कमी होत आहे , तर इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढत आहेत अशी आजची स्थिती आहे. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक भालचंद्र नेमाडे म्हणतात ; मातृभाषा हीच बोधभाषा होय ; मातृभाषेतूनच उत्तम शिक्षण घडू शकते . हीच गोष्ट १२५ वर्षांपूर्वी म.कर्वे यांनी सांगितली.यामधून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. अठराव्या शतकातच त्यांनी मातृभाषेतून शिक्षणाला जास्त महत्त्व दिले. स्रियांसाठी स्वतंत्र युनिवर्सिटी असावी परंतु तिथे स्वभाषेला प्रथम स्थान देऊन इंग्रजीला दुय्यम स्थान असावे असे त्यांचे मत होते. सर्व विषय स्वभाषेत शिकवले जावेत याकडे त्यांनी लक्ष दिले. स्रियांसाठी कमी वेळात, कमी श्रमात व कमी खर्चाने उच्च शिक्षण मिळण्याची सोय झाली पाहिजे अशा प्रकारच्या स्वभाषेत शिक्षण देणाऱ्या स्रीयांच्या युनिव्हर्सिटया स्थापन झाल्यावाचून शिक्षणाचा पाया भक्कम होणे नाही असे त्यांचे दूरदृष्टी विचार होते म्हणून त्यांनी देशातील पहिल्या विद्यापीठाची (भारतवर्षीय महिला विद्यापीठ ) स्थापना केली.

मातृभाषेला प्रथम स्थान दिले तरी त्यांनी इंग्रजी भाषेला कधीच विरोध केला नाही. तर जगाची माहिती घेण्यासाठी व शिक्षणाच्या कार्याचा प्रसार व प्रचार करण्यासाठी इंग्रजी शिक्षण आवश्यक आहेच याची त्यांना जाणीव होती म्हणून वयाची चाळीशी उलटल्यानंतरही त्यांनी पार्वतीबाई आठवले या आपल्या मेहुणीस इंग्रजी शिकण्यास प्रोत्साहन दिले.

जपानमधील स्री शिक्षणाविषयीचे उच्च विचार म. कर्वे यांच्या वाचनात आले .ते विचार त्यांना पटले म्हणून त्यांनी ते प्रत्यक्षात आणले.त्यातील काही महत्त्वपूर्ण विचार-

- स्रिया म्हणजे मानवजातीचे घटक आहेत हे ओळखून त्यांना शिक्षण देणे.
- सुपत्नी व सुमाता होण्याची पात्रता अंगी येईल असे शिक्षण देणे.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- आपल्या प्रापंचिक जीवनाचा राष्ट्राच्या उन्नती-अवनतीशी अस्फूट असला तरी निकटचा सबंध आहे असे त्यांच्या नेहमी ध्यानात राहील अशा प्रकारचे शिक्षण देणे.

या विचारांच्या पूर्ततेसाठी महिला विद्यापीठ स्थापन करून नवीन अभ्यासक्रम राबविला यावेळी शेफिल्ड युनिवर्सिटीचे व्हाइस चान्सलर डॉ. एच. ए. एल. फिशर भारतात आले असता त्यांनी म. कर्वे यांच्या कार्याचे, विचारांचे कौतुक केले. ते म्हणतात "आपले स्री शिक्षणाचे जे महत्वाचे कार्य चालू आहे त्यावर आपण स्रियांसाठी एका विश्व विद्यालयाची स्थापना करून कळसच चढवीत आहात आपणास यश लाभो ही सदीच्छा!" तसेच म. गांधीनीही त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना पाठिंबा दिला व मदतही केली.

शालेय शिक्षणात म. कर्वे यांनी मातृभाषेला बोधभाषा म्हणून प्रथम स्थान व इंग्रजीला दुय्यम स्थान ठेवले. मात्र उच्च शिक्षणासाठी त्यांनी इंग्रजी हा विषय ऐच्छिक न ठेवता आवश्यक केला. त्या संबंधी त्यांचे विचार असे होते की , उच्च शिक्षण घेणाऱ्या विध्यार्थ्यांनीना ज्ञानांचे दरवाजे मोकळे झाले पाहिजेत. आणि हे इंग्रजी भाषेवाचून होऊ शकत नाही. इंग्रजी भाषा ही जगाची भाषा झाली आहे.कोणत्याही गोष्टीची विशेष माहिती हवी असल्यास ती इंग्रजीच्या ज्ञानाशिवाय शक्य नाही.

जपानमध्ये इंग्रजांचे राज्य नसतानाही तिथे उच्च शिक्षणासाठी इंग्रजी विषय आवश्यक आहे ; मग भारतात का नको ? हा विचार त्यांनी जनमानसात पोहचवला. त्यासाठी देशभर प्रवास केला, सभा घेतल्या,भाषण दिली. व आपले शिक्षणविषयक विचार समाजापर्यंत पोहचवले.व ते विचार प्रत्यक्षात आणले. विद्यापीठ स्थापन झालेच पण त्याचा देशभर प्रसारही झाला.स्री पुरुषांमध्ये शिक्षणाच्या बाबतीत भेदभाव त्यांना कधीच मान्य नव्हता. स्री-पुरुषांची कार्यक्षेत्र भिन्न असली तरी दोघांची योग्यता सारखीच असते. या ठिकाणी उच्चनीच विचारसरणी नष्ट झाली पाहिजे असे ते मानत. या बाबतीत ते म्हणतात -

*आपण जबाबदार मानवी व्यक्ती आहोत ही भावना व आपल्या सामर्थ्याविषयी आत्मविश्वास निर्माण होईल असे पुरुष सामान्य शिक्षण स्रियांना देणे

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

*“गृहिणी गृहमुच्यते” या वाक्यातील अर्थानुसार सामर्थ्य ज्या शिक्षणाच्या योगाने स्रियामध्ये उत्पन्न होईल,असे शिक्षण त्यांना देणे.

*आपण देशाचा घटक आहोत ही भावना ज्या शिक्षणाने उत्त्पन्न होईल असे शिक्षण स्रियांना देणे.

*आपण कोणती विद्‍या शिकावी ? कोणता उद्‍योग करावा? यासाठी कायदा व समाजाचे कोणतेही बंधन असू नये,याबाबतीत स्री व पुरुषांचे हक्क समान असावेत.

म.कर्वे यांचे हे विचार अतिशय उपयुक्त असल्यानेच लंडन मधील इंडिया नावाच्या वृत्तपत्रात त्या विषयी सकारात्मक प्रतिक्रिया छापल्या गेल्या व त्यास पाठिंबाही मिळाला. सर वील्यम वेडरबर्न यांनी चालवलेल्या इंडिया बेनिफिट फंडातून म. कर्वे यांच्या आश्रमाला १५० पौंड व महिला विद्‍यापीठाला १०० पौड देण्यात आले. पुण्यातील ठाकरसी कुटुंबाने म. कर्वे यांना भरघोस देणगी दिली. ज्यामुळे विद्‍यापीठास मूर्त रूप प्राप्त झाले.व त्यांच्या कार्यास बळ मिळाले. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक कार्याचा मुंबई, सातारा, बेळगाव, सांगली, व सोलापूर याठिकाणी विस्तार झाला.

म. कर्वे यांनी स्री शिक्षणासबंधी प्रथमच असा विचार केला की , घरबसल्या करता येण्यासारख्या धंद्‍याचे शिक्षण स्रियांना मिळणे जरुरीचे आहे,कारण ९०% स्रियांचे हे शिक्षण आर्थिक स्वातंत्र्यासाठी , नोकरीसाठी नसून केवळ ज्ञानार्जनासाठी आहे.शिक्षणामुळे स्रिया स्वावलंबी,सक्षम झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. त्यासाठी मुलींना आवड निर्माण होईल असा गृहविषयक व व्यावहारिक माहिती आणि आरोग्यासंबंधीचे शिक्षणाचा अभ्यासक्रमात समावेश केला.उदा. प्रपंचशास्त्र , आरोग्यशास्त्र ,मानसशास्त्र इ. हे त्यांच्या विद्‍यापीठाचे वैशिष्ट्‍य होते कारण पत्नी व माता या बरोबरीने येणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास हे विषय उपयुक्त होते.

एवढेच नव्हे तर स्री शिक्षणाच्या या कार्याचा प्रसार करण्याचे काम स्रीयानीच करावे असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी स्रीयांसाठी सभा व व्याख्यानाचा उपक्रम केला. तसेच अनेक साक्षर स्रिया महाराष्ट्रातच नव्हे तर हिंदुस्थानभर जाव्यात व प्रचाराचे काम व्हावे यासाठी प्रयत्न केले. कारण माध्यमिक शिक्षणाचा प्रसार शहरातच नव्हे तर गावोगावी

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

झाला तरच राष्ट्राची उन्नती होईल असे त्यांचे ठाम मत होते. त्यांच्या या कार्याचे बडोद्याच्या महाराजांनीही कौतुक केले. महाराजांनी त्यांना बुकर टी. waoshigtan असे संबोधले.

राष्ट्राच्या प्रगतीचे विचार पुरुषांप्रमाणे स्त्रियाच्याही मनात घोळत असले पाहिजेत .यासाठी माध्यमिक शिक्षण पुरते मिळायला हवे.त्याचा प्रसार करण्यासाठी शिक्षिका हव्यात म्हणून १९१६ साली अध्यापिका विद्यालयाची स्थापना केली. स्त्रियांनी अल्प वेतनात संतुष्ट राहून स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराच्या कार्याला वाहून हेतले पाहिजे. अशा माध्यमिक शिक्षणाचे देशभर जाळे पसरले पाहिजे. अशी त्यांची इच्छा होती.

म.कर्वे यांना स्त्री शिक्षणासंबंधी अत्यंत तळमळ होती. पुण्यामध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासंबंधी बरेच वादविवाद झाले . १९२८ साली एक्काहत्तराव्या वाढदिवसाच्या मानपत्रास उत्तर देताना म.कर्वे यांनी पुढील उद्गार काढले ,"एक वेळ मुलांचे शिक्षण मागे पडले तरी चालेल , परंतु मुलींच्या शिक्षणाची योजना शक्य तितक्या लवकर अमलात येणे जरूरीचे आहे. एक वेळ मुलगा अशिक्षित राहिला तरी चालेल , परंतु मुलांचे शीलसंवर्धन करण्याकरता मातेने सुशिक्षित होणेच इष्ट आहे. म्हणून आपण सर्वांना माझी अशी विनंती आहे, की मुलांना व मुलींना शिक्षण देण्याच्या कामी आपण प्रयत्न करावेतच; परंतु द्रव्याच्या अभावी दोन्ही गोष्टी शक्य नसतील तर मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न मागे टाका परंतु स्त्रियांना सुशिक्षित करा."यासाठी ते जपानचे उदाहरण देतात . तिथे मुले व मुलींचे शिक्षणाचे शेकडा प्रमाण ९९% आहे, आपल्याकडे मुलांचे ८३% तर मुलींचे १% एवढेच आहे . ही स्थिती शोचनीय आहे.आपल्याकडे स्त्री शिक्षणाचे पाऊल पुढे पडत आहे परंतु ते झपाट्याने वाढले पाहिजे इतर देशांच्या बरोबरीचा दर्जा हिंदुस्थानास प्राप्त व्हावा असे वाटत असेल तर स्त्री शिक्षणाच्या कामी अविश्रांत कष्ट घेणे जरुरीचे आहे . स्त्री शिक्षणाचा प्रसार न झाल्यास देशाची उन्नती शक्य नाही.यावरूनच त्यांचे स्त्री शिक्षणासंबंधीचे उच्च विचार लक्षात येतात. त्या प्रसंगी श्री.तात्यासाहेब केळकर म. कर्वे यांच्या बद्दल म्हणतात ;" स्त्री –शिक्षणासंबंधीचा पूर्वीचा ग्रह पार बदलून टाकण्यास प्रो.कर्वे यांचीच कामगिरी कारणीभूत झाली. स्त्री-

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**शिक्षणासारख्या सुरवातीस अप्रिय वाटणाऱ्या कार्यास मदत मिळाली याचे श्रेय प्रो. कर्वे यांच्या व्यक्तिगत गुणांकडेच आहे . परमेश्वर त्यांना दीर्घायू करो.”**

**वैज्ञानिक शिक्षण प्रसारासाठी व वर्गणी गोळा करण्यासाठी कर्वे यांनी युरोपभर प्रवास केला. प्रो. आईनस्टाईन यांची भेट घेतली. ५० शहरांना भेटी दिल्या. व्याख्याने दिली. जर्मनीत ४० संस्था पाहिल्या. व या सगळ्याचा उपयोग स्री शिक्षणाच्या कार्यासाठी केला.**

*__निष्कर्ष__-

**एकंदरीत म. कर्वे यांचे स्री शिक्षणविषयक विचार अत्यंत उच्च,उपयुक्त व समाजोपयोगी होते.स्रियांना केवळ शालेय शिक्षणच नव्हे तर ललित कलांचेही शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. वाचन, गायन, खेळ, वक्तृत्व, समाजसेवा वृत्ती अशा अनेक अगांनी विचारपूर्वक कार्य केले.त्यामुळे स्री साक्षर तर झालीच पण स्वावलंबी , सक्षम, स्वतंत्र, धाडसी, व आत्मविश्वासू बनली.**

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies